प्रथम टप्प्यात राज्यातील पाच जिल्हयात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करणे
संगणक यंत्रणा खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
रोजगार व स्वयंरोजगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः रोस्वरो-२०१४/प्र.क्र.२१५/रोस्वरो-१
जी.टी.हॉस्पीटल कॉम्प्लेक्स इमारत, ५ वा मजला
नवीन मंत्रालय, मुंबई-४०००01
तारीख: २९ ऑक्टोबर,२०१४

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोगार विभाग, रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१ दिनांक १९ मे,२०१४
२) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१४/प्र.क्र.१०९/रोस्वरो-१ दिनांक २१ ऑगस्ट,२०१४
३) शासन निर्णय क्रमांकः आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांचे पत्र क्र.रोस्वसं-९/सीजीसीसी खरेदी समिती/८७२९/२०१४ दि.२७ ऑगस्ट,२०१४

शासन निर्णय –

शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१ दि.१९ मे,२०१४ अन्वये राज्यात रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पहिल्या टप्प्यात मुंबई उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग येथे अशी केंद्रे स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१४/प्र.क्र.१०९/रोस्वरो-१ दि.२१ ऑगस्ट,२०१४ अन्वये सदर योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

२. या शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंतर्गत खरेदी करावयाच्या संगणकाशी संबंधीत खालील यंत्रणेच्या खरेदीस येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | खरेदी करण्यात येणारी यंत्रणा | कोणत्या दर करारानुसार आहे | आवश्यक असलेले नग | दर करारानुसार प्रती नगाची किंमत (रुपये ) | येणारा एकूण खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) | ( ड) X (इ) |
| १ | स्कॅनर | Directorate General of Suppliers & Disposals, Govt. of India | ५ | २६२९२.८४/- | १३१४६४.२० |
| २ | प्रिंटर | | २५ | ८८२३.९९/- | २२०५९९.७५ |
| | एकूण खर्च | | | | ३५२०६३.९५/- |
| | (रुपये तीन लाख बावन्न हजार चौसष्ट फक्त) | | | | ३,५२,०६४/- |

३. सदर खर्च शासन निर्णय,रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.रोस्वरो-२०१४/प्र.क्र.१०९/रोस्वरो-१ दिनांक २१ ऑगस्ट,२०१४ अन्वये लेखाशीर्ष मागणी क्र.झेड ए-०१, प्रधान लेखाशीर्ष-२२३०-कामगार व सेवायोजन, ०२-सेवायोजना सेवा, ००१-सेवायोजन व प्रशासन, ०६- व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांची स्थापना ( २२३०६०३८) अंतर्गत प्रथम टप्प्यात राज्यातील पाच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करण्यासाठी संगणक खर्चासाठी वित्तीय वर्ष २०१४-२०१५ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या रु.६७,८४,८००/- एवढया रक्कमेतून भागविण्यात यावा.

४. सदर मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) उपरोक्त यंत्रणेची खरेदी विहीत कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.

२) यंत्र सामुग्री प्राप्त झाल्याखेरीज व ते निश्चित केलेल्या विनिर्दीष्टाप्रमाणे असल्याची खातरजमा केल्याखेरीज तसेच, यंत्रांच्या गुणवत्तेची खात्री पटल्याखेरीज कंपनीस रक्कम प्रदान करण्यात येऊ नये.

३) सदर यंत्रणेची नोंद संबंधित कार्यालयाच्या जडवस्तू संग्रह नोंदवहीत घेण्यात यावी.

५. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांनी विहीत पध्दतीने सदर खरेदी करावी. सदरहू निधी प्रत्यक्ष खर्च करतांना प्रचलित नियम तसेच, वित्तीय नियमावलीतील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचना यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५ मे,२००९ नुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग- पहिला, उप- विभाग-दोन मधील अनु. क्र.२८-अ नियम क्र.७६ नुसार प्रशासनिक विभागाला असलेल्या अधिकारास अनुलक्षून सदर खरेदीस मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१०३०१२००३०४४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Govt of Maharashtra, ou=Employment and self employment, postalCode=400032, st=maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2014.10.31 11:44:41 +05'30'

(उ.प्र.महाजन)

सह सचिव

प्रत,

१. महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३. उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
५. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकणभवन, नवी मुंबई
६. प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग, व्यय-१५,मंत्रालय,मुंबई
८. नियोजन विभाग, का-१४७१,मंत्रालय, मुंबई
९. महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था, मुंबई
१०. संचालक, यशदा, पुणे
११.कक्ष अधिकारी (रोस्वरो-२), रोजगार व स्वयंरोजगार विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई -०१
१२.निवड नस्ती (रोस्वरो-१)